माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये प्राप्त झालेले द्वितीय अपील

**अपील क्रमांक : १६१/२०२२**

अपिलार्थी – श्री. रोषण अशोकराव कामडी

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कारंजा (घा.), ता. कारंजा (घा.), जि. वर्धा

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,
तहसिल कार्यालय, कारंजा (घा.), ता. कारंजा (घा.), जि. वर्धा

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०२.२०२४

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.१०.२०२१ | निरंक | १५.११.२०२१ | १०.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.०८.१०.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "वार्ड नं. ३ वाघोडा मोजणी करून देणेबाबत" माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कुठलाच प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. १५.११.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती कालावधी संपूनही माहिती मिळाली नाही", असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.१२.२०२१ रोजी सुनावणी घेऊन दि. १०.१२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये, "अर्जदाराचा अपील अर्ज या स्तरावर नस्ती करण्यात येत आहे. अपिलकर्त्याने या विभागाशी अर्ज न करता तो सुस्पष्ट संबंधित उप अधीक्षक, भूमी अभिलेख विभागाकडे अर्ज करून माहिती उपलब्ध करून घेण्यात यावी", असा आदेश पारित केला आहे.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)नुसार आयोगाकडे **दि. १७.०१.२०२२** रोजी "चुकीची माहिती मिळाल्याबाबत" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. २०.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. २७.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी, श्री. रोषन अशोकराव कामडी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कारंजा (घा.), जि. वर्धा, श्री. शैलेंद्रकुमार मनोहरराव टिपरे उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, कारंजा (घा.), जि. वर्धा, श्री. शैलेंद्रकुमार मनोहरराव टिपरे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरून असे निदर्शनास आले की, अपिलार्थी, श्री. रोषण अशोकराव कामडी यांनी दि. ०८.१०.२०२१ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र अ अन्वये वार्ड क्र. ३ वाघोडा येथे दि. २८.१०.२०२० रोजी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तलाठी कार्यालयाला प्लॉट मोजून देणेबाबत तहसिल कार्यालय, कारंजा (घा.), जि. वर्धा यांनी दिलेल्या निर्देशावर काय कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती मागितली असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कुठलीच माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दि. १५.११.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर सुनावणी घेऊन दि. १०.१२.२०२१ रोजी तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, कारंजा (घा.) यांनी आदेश पारित केला असून त्यात जोडपत्र अ अनुसार मागविण्यात आलेली माहिती ही तहसिलदार, तहसिल कार्यालय, कारंजा (घा.) यांच्याशी संबंधित नसून उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयाशी संबंधित आहे. तरी, उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयात रीतसर अर्ज करून व फी चा भरणा करून भूखंडाची मोजणी करण्याबाबतच्या सूचनादेखील यात दिलेल्या आहेत. याविरुध्द अपिलार्थी श्री. कामडी यांनी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल करून चुकीची माहिती मिळाल्याचा आक्षेप नोंदविला आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी दाखल केलेले जोडपत्र अ, त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, कारंजा (घा.) यांनी दिलेला आदेश लक्षात घेता अपिलार्थी यांनी दाखल केलेली माहिती ही जर उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयाशी संबंधित असल्यास कलम ६ (३) अन्वये वरील माहितीचा अर्ज हा उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयास हस्तांतरित करणे जन माहिती अधिकारी स्तरावरून अपेक्षित असून अपिलार्थी यांचा दि. ०८.१०.२०२१ रोजीचे जोडपत्र अ हे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, कारंजा (घा.) यांच्यावतीने तात्काळ उपअधीक्षक, भूमी अभिलेख या कार्यालयास हस्तांतरित करण्यात यावा. उपअधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयास जोडपत्र अ मधील माहिती उपलब्ध असल्यास असा अर्ज प्राप्त झाल्यास माहिती अधिकार अधिनियमात नमूद कालावधीत विनामुल्य माहिती प्रदान करण्यात यावी. तसेच अपिलार्थी यांनी वरील माहिती अर्जात कार्यवाहीची अपेक्षा केलेली असून जरी वरील बाब ही माहिती अधिकाराच्या कार्यकक्षेबाहेरील असली तरी करण्यात आलेली विनंती ही शासनाच्या दैनंदिन कामकाजाशी संबंधित असल्याने विद्यमान तहसिल कार्यालय, कारंजा (घा.) यांनी प्रस्तुत जोडपत्र अ व ब याला निवेदनाच्या स्वरुपात हाताळावे. त्यानुसार विद्यमान तहसिलदार यांनी यावर प्रचलित नियमानुसार जोडपत्र अ व ब याला हाताळणी करून मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या सन २०१३ रोजी जारी

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★नागपूर★

केलेल्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीत योग्य तो निर्णय घेण्याच्या सुचनेसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★ नागपूर ★

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २७.०२.२०२४**

जावक क्रमांक ------2757------ दिनांक ------10 MAY 2024------

प्रत,

उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, कारंजा (घा.), जि. वर्धा